# भारतीय राष्ट्रवाद आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर

प्राचार्य डॉ. जे.एस भोयर
*कै. बाबुराव पाटील महाविद्यालय हिंगोली*

"शिक्षण हे वाघीणीचे दुध असुन...
ज्याने ते पीले ते गुरगुरल्याशीवाय राहत नाही."डॉ. बाबासाहेब आंबेडकर

"डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे 20 व्या शतकातील एक उत्सुंग व्यक्तीमत्व, विचारवंत, बुध्दीवंत आणि थोर राष्टवादी म्हणून ओळखले जातात." 20 व्या शतकातील डॉ. बाबासाहेबांचे कार्य अमुल्य व उल्लेखनिय असून त्यांनी ज्वलंत राष्ट्रवाद उभा करण्याचे आयुष्यभर प्रयत्न केले. ते स्वातंत्र, समतेचे पाईक होते. त्यांनी आयुष्यभर दारिद्रय, विषमतेविरोधात संघर्ष केला. एवढेच नव्हे तर देशामध्ये जो जातीवाद होता त्याविरूध्द सतत आवाज उठवत जातीवाद नाहीसा करण्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी आयुष्यभर प्रयत्न केले. इतकेच नव्हे तर अनेक चळवळी उभ्या केल्या आणि सामाजिक क्रांती सुरू करून देशाच्या हितासाठी ती उपयोगात आणली.

सत्तेशिवाय कोणताही करार करणे शक्य नाही हे डॉ. बाबासाहेबांना माहीत होते. डॉ. बाबासाहेबांनी सावकारांच्या हिंदू राष्ट्राला व महात्मा गांधींच्या राजकिय धोरणांना प्रचंड विरोध केला. त्यामागील मुख्य हेतू दलित, मागास व तळागाळातील समाज एकत्र व्हावा त्यांची उन्नती व्हावी व आपल्या मुलभुत हक्कासाठी लढता यावे. यासाठी लोकशाही समाजवादी पक्ष स्थापन करावा हा त्यांचा उद्देश होता. त्यातुन अस्पृश्यतेला लागलेला कलंक नष्ट होणार होता. दिन, दलीत, उपेक्षीतांच्या जीवनातील अंधार दूर करून त्यांच्या जीवनात नविन आशेचा प्रकाशकिरण निर्माण करूण उपेक्षीत, शोशीत दलीतांचे जीवनमान प्रकाशमान करण्याचा प्रयत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा होता. जातीवाद हाच खरा राष्ट्रवादासमोरील मोठा शत्रु आहे. हे ते जाणून होते. म्हणून जातीवाद नष्ट करून देशात समता प्रस्थापीत करणे हे डॉ. बाबासाहेबांचे मुख्य ध्येय होते.

डॉ बाबासाहेब हे कट्टर राष्ट्रनिष्ठ होते. तसेच ते अन्याय आणि अत्याचाराने व आर्थिक शोषनाने गांजलेल्या लोकांसाठीचे प्रेरणास्थान होते. त्यांचे राष्ट्रप्रेम थॉट्स ऑण पाकीस्तान, ॲनिव्हीलेशन ऑफ कास्ट, रानडे, स्टेटस ऑन मायनारीटिज, गांधी ॲन्ड जीना या ग्रंथातुन बाबासाहेबांचे राष्ट्रवादासंबंधीचे विचार स्पष्ट दिसुन येतात. डॉ. बाबासाहेबांच्या भाषणातुन किंवा लेखनातुन, पत्रकारीतेतुन राष्ट्रवाद निर्माण करण्याचे अथक प्रयत्न केलेले दिसुन येते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा राष्ट्रवाद हा मानवाच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय समस्यांची सोडवणूक करणे हा त्यांचा राष्ट्रवाद होता. ते नेहमी म्हणत देश स्वातंत्र झाला म्हणजे माणसं स्वातंत्र होणे का? त्यांच्यामते देशातील दिन, दलित, अस्पृश्य यांची सामाजिक व आर्थिक उन्नती झाली तरच खरे स्वातंत्र मिळाले. असे डॉ. बाबासाहेबांना अभिप्रेत होते. डॉ.बाबासाहेबांनी इंग्रजी राजवटीला प्रखर विरोध केला.

त्यांच्यामते ब्रिटिशांनीच देशाला गुलाम बनविले आहे. देशाच्या दारिद्रयाला ब्रिटिशच जबाबदार आहेत. हे डॉ.बाबासाहेबांनी प्रकर्शाने मांडले. त्यांनी कधीही आक्रमक राष्ट्रवादाचे समर्थन केले नाही. डॉ.बाबासाहेबांनी सन्मान आणि कर्तव्याला प्राधान्य दिले. कायदा आणि सुव्यवस्थेचे पालन करून आपल्या सामाजिक, आर्थिक, राजकीय मागण्या मान्य करून घ्यावा असा संदेश देऊन राष्ट्रवादाची स्पष्ट भूमिका मांडली यामुळेच डॉ. आंबेडकरांच्या राष्ट्रवादाची दखल देशच नव्हे तर जगाने घेतली आहे.

“सत्यमेव जयते” हा मंत्र डॉ.बाबासाहेबांनी आपल्या संपुर्ण आयुष्यभर अंगीकारला त्यामुळेच त्यांना त्यांच्या जीवनात अनेक संकटांना सामोरे जावे लागले. असंख्य संकटे त्यांनी पार केलीत पण सत्याच्या मार्गातून ते थोडेही मागे सरकले नाही. ते अस्पृश्य असल्याने त्यांना अनेक महत्वाच्या निर्णयातुन डावळल्या गेले. असे असले तरी त्यांचा राष्ट्रवाद व सत्यवाद कधीही डहमळीत झाला नाही. ते कायदेपंडीत, तर होतेच त्याच बरोबर उत्कृष्ट संसदपद, जागतिक किर्तीचे अर्थतज्ञ, समाजपंडीत, राजकीयतज्ञ, इतिहासतज्ञ, विज्ञानवादि, संस्कृततज्ञ, व्यापार व शेतीतज्ञ याचबरोबर ते अनेक विषयात तज्ञ होते.

खऱ्या अर्थाने डॉ.बाबासाहेब हेच मतदानाचे जनक आहेत. त्यामुळे देशाच्या विकासाला लोकशाही मार्गाने गती देण्याचे काम डॉ.बाबासाहेबांनी केले. एक व्यक्ती, एकमत व एक मुल्य यामताचे ते पुरस्कर्ते होते...

त्यामुळेच आज भारताचा पंतप्रधान राणीच्या पोटातुन नव्हे तर मताच्या पेटीतुन निवडला जातो. याचे सर्व श्रेय बाबासाहेबांना जाते.

शिक्षण हेच राष्ट्रउभारणीचे साधन आहे. हा मंत्रही डॉ.बाबासाहेबांनी देशवासीयांना दिला. शिक्षण नसेल तर माणुस जिवंत असतानांच इतरांचा गुलाम होतो. हे म्हणने स्पष्टपणे त्यांनी मांडले. शरीरातले अन्न जितके महत्वाचे आहे तितकेच शिक्षणही मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्वाचे आहे. हे देशाला पटवून देण्याचे कार्य डॉ.बाबासाहेबांनी केले. ते म्हणत ज्या देशात सुरक्षीत माणसे असतात त्या देशाला महासत्ता होण्यापासुन कुणीही रोकु शकत नाही. शिक्षण हे देशाला उंच शिखरावर नेण्याचे कार्य करते. एवढेच नव्हे तर शिक्षण हेच एकमेव शास्त्र आहे कि, ते देशाला आधुनिकरणाकडे नेते असा विज्ञानवादी दृष्टीकोन डॉ.बाबसाहेबांचा होता त्यांच्यामते मनुष्याचा विकास हा विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे होतो. आणि त्यातुन राष्ट्रविकास घडून येतो. शिक्षणाचे महत्व मानवी जीवनात अनन्यसाधारण असुन शिक्षण हेच मानसावर सुसंस्कार घडविण्याचे कार्य करते. म्हणूनच वयाच्या 14 व्या वर्षापर्यंत सर्वांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्यात यावे असे स्पष्ट मत मांडून आपण राष्ट्रवादी असल्याची प्रचीती दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा या मुलभुत गरजा असुन शिक्षण हिसुध्दा मुलभुत गरजच आहे. असे स्पष्ट मत मांडले. प्राचीन काळापासुनच स्त्रिशिक्षणाकडे दुर्लक्ष

झाले आहे. स्त्रिला नेहमीच दुय्यम स्थान दिले. चुल आणि मुल ईतक्यातच स्त्रिला गुंतवून ठेवून स्त्रियांना दुय्यम स्थान दिले. मनुस्मृतीच्या नियमानुसार हजारो वर्ष उपभोग्य वस्तु तसेच गुलाम म्हणून जीवन जगत राहीलेल्या. स्त्रियांना स्वाभीमानाने जगण्याचा अधिकार डॉ. बाबासाहेबांमुळेच मिळाला हे सत्य आहे. माणूस म्हणून जगण्याचा अधिकार स्त्रियांना डॉ.बाबासाहेबांच्या संविधानाने दिला. डॉ.बाबासाहेबांच्या मते स्त्रि शिकली तर सासर आणि माहेर या दोन्ही कुळांचा आधारस्तंभ बनेल. समाजाची प्रगती ही त्या समाजातील किती स्त्रिया शिक्षीत आहेत यावरून समजते. शिक्षण हाच खरा प्रगतीचा मार्ग आहे. ज्या देशात स्त्रिशिक्षणाचे प्रमाण जास्त आहे त्या देशाची प्रगती झालेली आहे. हे निर्वीवाद सत्य जगासमोर मांडण्याचे कार्य डॉ.बाबासाहेबांनी केले. इतकेच नव्हे तर समाजात स्त्रि-पुरूष समानता आणण्यासाठी तसेच समाजातील अनिष्ठ प्रथा दुर करण्यासाठी घटनेत तरतुद केली आहे. या सर्व घटनांचा अभ्यास केल्यास डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे राष्ट्रउभारणीत अग्रेसर होते असे स्वाभीमानाने म्हणावे लागेल.

1918 साली डॉ.बाबासाहेबांनी भारतातील लहान-लहान शेतीचे तुकडे कसे राष्ट्राच्या विकासात अडचणीचे ठरत आहे या विषयी “स्मॉल होल्डींग इन इंडिया ॲन्ड देअर रेमीडीज” हे पुस्तक लिहुन शेतीच्या समस्या जगासमोर मांडल्या. ते पुस्तक आजही उपयुक्त आहे. शेती फायदेशीर व्हावी यासाठी तंत्रज्ञानाचा वापर जलसींचन, शेतीला औदयोगीक दर्जा तसेच शेतमालाला योग्य भाव मिळावा हे त्यांनी त्यावेळीच स्पष्ट केले. असे असतांनाही शेतीवर काम करणाऱ्याचे आझे देखील कमी झाले पाहिजे हेही आवर्जुन स्पष्ट केले.100 वर्षापुर्वी केलेले भाकीत आज सत्यात उतरलेले दिसून येते. यावरूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे देशाच्या विकासासाठी दुरदृष्टीने विचार करत होते हे स्पष्ट होते.

त्यांना घटनात्मक समाजवाद अभिप्रेत होता. डॉ.बाबासाहेबांनी भारतातील पुर्ण जमीनीचे राष्ट्रीयीकरण व्हावे असे वाटत होते. त्यामुळे देशात कुठेही जमीनदार वा मजूर असणार नाही. सर्वांनी सामुहीक शेती करावी. भारतातील कोकण भागात खोत पध्दती अस्तीत्वात होती.

खोत म्हणजे गावातील एक सुलतान जो कुणावरही मनमानेल तसा अन्याय-अत्याचार करत असे. त्यामुळे कुळाची परिस्थिती अत्यंत वाईट होत होती. ही खोत पध्दत बंद करण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी 17 सप्टेंगर 1937 रोजी विधेयक कायदेमंडळात मांडुन ती पध्दत बंद पाडण्यास भाग पाडले. त्यामुळे शेतजमीन मालक व शासनाचा प्रत्यक्ष संबंध प्रस्थापीत झाला व कुळावर होणारे अन्याय अत्याचारही बंद झाले. शेती सुधारणेमध्ये कायदयाने अमुलाग्रबदल करण्याची ही एक नांदि ठरली. या सर्वा बाबींवरून डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे कट्टर राष्ट्रवादी होते हे स्पष्ट होते. व त्यांचे कार्य हे देशाच्या विकासासाठी व अखंडतेसाठी अमुल्य होते हे सिध्द होते.

संदर्भ ग्रंथ :


1. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्र - पॉप्युलर प्रकाशन मुंबई - लेखक : धनंजय किर
2. महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास - अरूना प्रकाशन नांदेड - डॉ. अनिल
3. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे - खंड 18 संपादक बबन कांबळे
4. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ - महाराष्ट्र सा. व संस्कृती मंडळ मुंबई
5. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हैद्राबाद संस्थान. डॉ. शेषराव वानखेडे निर्मल प्र. नांदेड
6. सार्थ मनुस्मृती - विष्णूशास्त्री बापट - प्रकाशक गजेंद्र विठ्ठल सुर्यवंशी
7. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना - रावसाहेब कसबे - सु. प्रकाशन पुणे
8. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याच शब्दात. ग. प्र. प्रधान सुगावा प्रकाशन पुणे